International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Review Of Research**
ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF)
Volume - 4 | Issue - 9 | June - 2015 Available online at www.isrj.org

# सोलापूर जिल्ह्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास.

**ए.एन.पवार**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी जि.उस्मानाबाद. महाराष्ट्र.

Short Profile :
A.N.Pawar is Head of Department at Economics in College Karmaveer mamasaheba Jagdale College, Vashi Dist . Osmanabad Maharashtra

Co-Author Details :
**सुभाष रामचंद्र माने**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग जि. उस्मानाबाद. महाराष्ट्र .



**प्रस्तावना :-**

सोलापूर हा जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय भागात आहे. जिल्ह्याचे मुख्यालय सोलापूर हे ठिकाण समुद्र सपाटीपासुन ५५० मी. उंचीवर आहे. जिल्हा १७.१० अंश ते १८.३२ अंश उत्तर अक्षांश व ७४.४२ अंश ते ७६.१५ अंश पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे.

सोलापूर जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय सोलापूर येथे आहे. प्रशासकीय रचनेनुसार जिल्ह्यामध्ये एकुण ११ तालुके आहेत. २०११ च्या जिल्हा समालोचन अहवालानुसार जिल्ह्यात एकुण १० शहरे, ११५० गावे आहेत. त्यापैकी निर्जन गावांची संख्या १२ आहे. तसेच सोलापूर येथे महानगरपालिका असुन जिल्ह्यात ९ नगर परिषदा, ११ पंचायत समित्या व १०२८ ग्राम पंचायती आहे. सोलापूर जिल्ह्याचे एकूण भौगोलीक क्षेत्रफळ १४८७८४३ चौ. कि.मी. असुन ते महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळांच्या ४.८४ टक्के आहे. जिल्ह्यांच्या एकुण क्षेत्रफळांपैकी १.१५ टक्के (१७०.७९) चौ. कि.मी क्षेत्र नागरी व ९८.८५ टक्के (१४७२४.२१) चौ. कि.मी. क्षेत्र ग्रामीण आहे.

## उद्दीष्ट्ये :-

प्रस्तुत शोध निबंधासाठी पुढील उद्दीष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

१) रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड योजनेची माहिती घेणे.

२) रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३) रोजगार हमी योजनेतुन निर्माण होणाऱ्या (श्रमदिन) रोजगार निर्मितीचा आढावा घेणे.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेला आहे. या मध्ये विविध पुस्तके, नियतकालिके, विविध लेख, वर्तमानपत्रे व संदर्भ साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

## हवामा-न :-

सोलापूर जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. हवामानाच्या दृष्टीने संपूर्ण जिल्हा पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडतो. मान्सुनचा कालावधी जूनच्या पहिल्या पंधरवड्यापासून सप्टेंबर अखेर असतो. जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ८०७.२१ मि.मि. आहे. संपूर्ण जिल्हा अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणुन जाहीर केला आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या २७.२७ लाख होती. सन २०११ च्या जनगणने नुसार सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या २९.१७ लाख आहे. सन २०११-१२ अखेर सोलापूर जिल्ह्यात एकूण निव्वळ ओलीता खालील क्षेत्र १२३३६८ हेक्टर इतके होते. या ओलीता खालील स्थुल क्षेत्राची लागवडी खालील स्थुल क्षेत्राशी टक्केवारी १७.९२ इतकी होती.

## पिक रचना :-

सोलापूर जिल्ह्यात सन २००२-०३ मध्ये प्रामुख्याने एकुण पिकाखालील क्षेत्रापैकी तृणधान्याखाली ७३.८८ टक्के क्षेत्र होते. एकुण □डधान्य पिकाखालील क्षेत्र ७०१७४ हेक्टर, एकुण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र ८४४८९७ हेक्टर, तर एकूण फळे व भाजीपाला पिकाखालील क्षेत्र ४८९६१ हेक्टर होते. तेलबिया ५४ हजार हेक्टर, ऊस ६६ हजार हेक्टर तर कापूस पिकाखालील क्षेत्र ४ हजार हेक्टर होते. जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये २८५१७० टन इतके अन्नधान्य उत्पादन झाले आहे. तर २६९२७ टन कडधान्य उत्पादन झाले आहे. जिल्ह्यात भूईमुग ७९२ टन, सूर्यफुल २२४२ टन, एकूण तेलबिया ३०३४ टन, कापूस २५३ टन झाले होते.

## फलोत्पादन :-

सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे कोरडवाहु शेती मोठ्या प्रमाणात आहे. कोरडवाहु जमिनीमध्ये फळझाड लागवड फायदेशीर ठरत असल्यामुळे दिवसेंदिवस फलोत्पादन क्षेत्रात वाढ होत आहे. जिल्ह्यात अंबा , बोर, सिताफळ, लिंबू, द्राक्षे, केळी व इतर फळ पिकांचे उत्पादन घेतले जाते. सोलापूर जिल्ह्यात एकूण फळे व भाजीपाला पिकांखालील क्षेत्र ४८९६१ होते यांचे निव्वळ कसलेल्या □त्राशी प्रमाण ४.८६ टक्के इतके होते.

सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यात सर्वाधीक म्हणजे १४.८४ टक्के क्षेत्र एकूण फळपिकांखालील क्षेत्राच्या खाली आहे. तर सर्वात कमी अक्कलकोट तालुक्यात फळपिकांखालील क्षेत्र आहे. करमाळा, बार्शी, सांगोला, मंगळवेढा तालुक्यात जवळ-जवळ सरासरी जिल्ह्यातील एकूण फळपिकांच्या क्षेत्रापैकी १० टक्के क्षेत्र या तालुक्यामध्ये आहे.

सोलापूर जिल्ह्यात इतर फळपिकांखालील क्षेत्र २४४३९ हेक्टर म्हणजे जिल्ह्यातील एकूण फळपिकांखालील क्षेत्राच्या ८०.१७ टक्के क्षेत्र डाळींब, बोर, सिताफळ इत्यादी फळ पिकांखाली आहे. त्या खालोखाल आंबा उत्पादनाखालील क्षेत्र ३९०० हेक्टर म्हणजे १०.०२ टक्के इतके आहे. केळी उत्पादनाखालील क्षेत्र नगण्य आहे. हे प्रमाण जवळजवळ २ टक्के इतके आहे.

### रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड :-

महाराष्ट्र राज्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये फळ पिकांचा प्रमुख सहभाग आहे. फळांचे बाजारमुल्य अधिक असल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होतो. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन घडवुन आणण्यासाठी सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम सुरू केला आहे. राज्यातील ३३ जिल्ह्यांत ही योजना राबविली जात असून सुमारे ४० हजार गावांमध्ये ही योजना पोहोचली आहे.

### लाभ धारकाची निवड :-

गावात ज्यांच्या नावावर जमीन आहे असे सर्व शेतकरी, विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यता प्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व इतर सुतगिरण्या वगळुन) ही जमीन कुळकायद्याखाली येत असल्यस ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी. यासाठी २० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेणे आवश्यक राहणार नाही.

### लाभार्थीची निवड करण्याची पध्दती व प्राधान्यक्रम :-

- इच्छुक लाभार्थींनी विहीत नमुन्यातील आवश्यक माहिती ७/१२ व ८-अ चे उताऱ्यासह सादर करावा.
- किमीत कमी १५ टक्के अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थींची निवड करावी.
- यामध्ये अनुसूचित जाती/ जमाती/ अल्प व अत्यल्प भूधारक यांना प्राधान्य देण्यात यावे.
- जल संधारणाच्या पाणलोट क्षेत्रातील गावात फळझाड लागवडीस प्राधान्य देण्यात यावे.
- पडील जमिनीवर लागवडीचा प्रस्ताव.
- कोरडवाहू फळपिकांचे लागवडीचे प्रस्ताव.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे त्या ठिकाणी फळझाड लागवडीचे प्रस्ताव.
- नविन गावांना तसेच नविन लाभार्थींना प्राधान्य द्यावे.
- महिला लाभार्थीना प्राधान्य द्यावे.

- ज्या लाभार्थ्यांकडे पाण्याची सुविधा उपलब्ध आहे त्यांना त्यांच्या वर्गात प्राधान्य दिले जाईल.
- सलग समतल चर घेतलेल्या क्षेत्रावर (सी.सी.टी.) फळझाडांच्या लागवडीसाठी लाभार्थीची निवड प्राधान्याने करावी.
- ज्या लाभार्थींची आगीमुळे फळबाग जळाली आहे अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा.
- ज्या जिल्ह्यामध्ये जमीन व हवामानानुसार जी फळझाडे चांगल्या प्रकारे येऊ शकतात त्याच लागवडीसाठी प्राधान्य देण्यात यावे.

### त्र मर्यादा :-

- ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, चंदपूर व गडचिरोली या जिल्ह्यांतील सर्व तालुके व पश्चिम घाट क्षेत्रातील खालील तालुक्यांमध्ये लागवडीची प्रति लाभार्थी कमीत कमी क्षेत्र मर्यादा ०.१० हेक्टर राहील.
- ज्या शेतकऱ्यांनी फलोत्पादन विकासाच्या इतर योजनांमध्ये तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या ार्यक्रमांतर्गत यापूर्वी भाग घेतला असेल तर त्यांचे पूर्वीचे क्षेत्र गृहीत धरून एकुण चार हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत हा कार्यक्रम शेतकरी राबवु शकतील. मात्र पूर्वी त्यांचेकडे यापूर्वी जी लागवड करण्यात आलेली आहे. ती यशस्वी झाली असली पाहिजे. कोकण विभागात जास्तीत जास्त १० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत हा कार्यक्रम राबविता यईल.
- विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्या खालील प्रमाणित झालेल्या मान्यताप्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूतगिरण्या वगळून) १० हेक्टर कमाल मर्यादेपर्यंत लागवड करू शकतील. ही लागवड एका वर्षात किंवा त्या नंतरच्या कालावधीत देखील करता येईल.
- लाभधारकांचे ७/१२ उताऱ्याच्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर, त्याच्या हिश्याच्या क्षेत्राच्या प्रमाणानुसार लाभ देयात येईल.

### अनुदान वितरित करण्याचे निकष :-

- या कार्यक्रमांतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या ७/१२ वर त्या बाबतची नोंद घेतल्याशिवाय अनुदान देण्यात येऊ नये.
- पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणकानुसार मापन पुस्तिकेत नोंद घेऊन मापदंडानुसार तपासणी नंतर देय असलेले अनुदान देण्यात यावे. त्यामध्ये पाणी देणे, आंतर मशागत, कुंपण, या बाबींवरील खर्च पहिल्या वर्षी देण्यात येऊ नये. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी एकत्रितपणे देण्यात यावा.
- दुसऱ्य व तिसऱ्या वर्षी बागायती फळपिकांच्या बाबतीत ७५ टक्के झाडे जिवंत ठेवतील. त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षांचे अनुदान देय राहील.
- लाभार्थ्यांकडे २० टक्क्यांपेक्षा जास्त कलमे/ रोपांची मर असल्यास कांही लाभार्थी रोखीने कलमे/ रोपे विकत घेऊ शकत नाहीत. पर्यायाने जिवंत झाडांची टक्केवारी विहीत प्रमाणात राखली जात नाही. म्हणुन ज्या लाभार्थीकडे २० टक्क्यांपेक्षा जास्त कलम-रोपांची मर आहे असे लाभार्थीचे क्षेत्रावर जिवंत झाडांचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने नांग्या भरण्यासाठी आवश्यक लागणारी कलमे/ रोपे यांचा

पुरवठा करण्यात यावा. २० टक्क्यांपेक्षा जास्त नांग्या भरण्यासाठी जादा कलमे/ रोपांची रक्कम संबंधीत लाभार्थ्यांच्या देय असलेल्या अनुदानातुन कपात करण्यात यावी.

### लाभार्थींच्या जबाबदाऱ्या :-

- योजनेत भाग घेणारा लाभार्थी हा गावातील त्यांच्या स्वत: व आपल्या कुटुंबातील कार्यक्षम व्यक्तीस रोजगार हमी योजने अंतर्गत प्रमाणित मजुर म्हणुन घोषीत करील.
- योजनेअंतर्गत शासनाने ठरवुन दिलेली खर्च प्रमाणके ही वैयक्तिक भाग घेणाऱ्या लाभार्थ्यांस मंजूर करावीत. निश्चित केलेल्या खर्च प्रमाणकापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी स्वत: घेण्या बाबत त्याची लेखी संमती घ्यावी.
- लाभार्थ्यांना देय अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी त्याने राष्ट्रीयकृत बँक अथवा सहकारी बँकेत खाते उघडावे, खाते क्रमांक तालुका कृषी अधिकारी यांना कळवावे.

### अभ्यास क्षेत्रातील प्रगती :-

ही योजना राज्यातील ३३ जिल्ह्यांत राबवली जात आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या सोलापूर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांची प्रगती म्हणजेच एकूण लागवडीखालील क्षेत्र व लाभार्थी संख्या यांची माहिती तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. १.१**

**सोलापूर जिल्ह्यातील फळझाड लागवड क्षेत्र (हे.) व लाभार्थी संख्या १९९०-९१ ते २०१०-११**

| अ.क्र. | वर्ष | क्षेत्र | शेकडा प्रमाण | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९०-९१ ते १९९९-२००० | ६००३४ | ६३.५० | ९७५०६ | ६५.५० |
| २ | २०००-०१ | १७५९ | १.८६ | २४३३ | १०.८४ |
| ३ | २००१-०२ | २४३५ | २.५८ | ३८४० | २.५८ |
| ४ | २००२-०३ | १९७० | २.०८ | ३३९८ | २.२८ |
| ५ | २००३-०४ | १५२५ | १.६१ | २३१७ | १.५६ |
| ६ | २००४-०५ | ३७७६ | ३.९९ | ५९४२ | ३.९९ |
| ७ | २००५-०६ | ४९४४ | ५.२३ | ७९६३ | ५.३५ |
| ८ | २००६-०७ | ३५२१ | ३.७२ | ५०८६ | ३.४२ |
| ९ | २००७-०८ | ३३८ | ०.३६ | ४५२२ | ३.०४ |
| १० | २००८-०९ | ४०८८ | ४.३२ | ५६८७ | ३.८२ |
| ११ | २००९-१० | ७०९७ | ७.५१ | ९८६६ | ६.६३ |
| १२ | २०१०-११ | ९४५३७ | ६.३० | १४८८६० | ७.५० |

पुढील पानावर चालू

| | | |
|---|---|---|
| **एकूण महाराष्ट्र** | **१५०००००७** | **१९८५४८९** |

स्त्रोत : महाराष्ट्र शासन, संचालक फलोत्पादन, (अप्रकाशित माहिती)

वरील तक्त्याचे अवलोकन केल्यास असे दिसते की, सन २०००-०१ मध्ये फळबाग लागवडी खालील क्षेत्र ६००३४ हेक्टर होते, तर लाभार्थी संख्या २४३३ होती. तर २०१०-११ मध्ये जिल्हयातील फळबाग लागवड क्षेत्र ९४५३७ हेक्टर (६.३० टक्के) इतरके आहे. तसेच लाभार्थी संख्या १४८८६० इतकी असुन त्याचे महाराष्ट्राशी प्रमाणे ७.५० टक्के इतके आहे.थोडक्यात एकुण फळबाग लागवड क्षेत्र व लाभार्थी संख्या यामध्ये वाढ झाल्याचे दिसते.

### रोजगार निर्मिती :-

शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतावर नियमस्वरूपी रोजगार निर्माण करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सन १९९०-९१ ते २०११-१२ या कालावधीतील सोलापूर जिल्हा व महाराष्ट्र राज्य रोहयो अंतर्गत फळबाग कार्यक्रमांतर्गत निर्माण झालेली रोजगार निर्मिती तक्ता क्र. १.२ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १.२**

**सोलापूर जिल्ह्यातील एकुण लागवड क्षेत्र व श्रमदिन (१९९०-९१ ते २०११-१२)**

| अ.क्र. | जिल्हा | १९९०-९१ ते २०१०-११ | | २०११-१२ | | १९९०-९१ ते २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवड क्षेत्र (हे.) | श्रमदिन | लागवड क्षेत्र (हे.) | श्रमदिन | लागवड क्षेत्र (हे.) | श्रमदिन |
| १ | सोलापूर | ९६७४० (६.३) | ४५०.८७ (६.०) | ३३७५ (१०.५०) | १७.५२ (१०.७८) | १००११५ (६.३७) | ४८६.३९ (६.३८) |
| **एकुण महाराष्ट्र** | | **१५४०३२९** | **७४६४.७१** | **३२१३३** | **१६२.४८** | **१५७२४६२** | **७६२७.२७** |

स्त्रोत : महाराष्ट्र शासन, संचालक फलोत्पादन, (अप्रकाशित माहिती)

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, सन १९९०-९१ ते २०११-१२ या कालावधीत महाराष्ट्रात ७६२७.२७ श्रमदिन इतकी रोजगार निर्मीती झाली आहे. त्यापैकी सोलापूर जिल्ह्यात ४८६.३९ श्रमदिन म्हणजेच ६.३८ टक्के रोजगार निर्मीती झाल्याचे स्पष्ट दिसते.

### निष्कर्ष :-

अशा पध्दतीने रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमाचे मुल्यमापन केल्यास असे दिसून येते की, योजना सूरू झाल्यापासून महाराष्ट्रातील एकूण फलोत्पादन क्षेत्र, उत्पादन, लाभार्थी संख्या, रोजगार निर्मीतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ही योजना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत आहे असे दिसुन येते.

**संदर्भ :-**


१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा २०११-१२, प्रकाशन अर्थ व सांखिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

२) Solapur District Gaxettee, Available at www.solapurdistrict.gov.in.

३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१२-१३, अर्थ व सांखिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) महाराष्ट्र कृषी विभाग (२०१३) रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड कार्यक्रम सन १९९०-९१ ते २०११-१२ अहवाल (अप्रकाशित) संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे-५

५) विनयकुमार आवटे दै.सकाळ, ॲग्रोवन पुरवणी दि.१५ मे २०१५ पृ.१० .

६) विनयकुमार आवटे दै.सकाळ, ॲग्रोवन पुरवणी दि.१६ मे २०१५ पृ.१०